अपंग व्यक्ती अधिनियम मधील तरतूदीनुसार शासनाच्या आस्थापनेवरील पदे अपंग प्रवर्गासाठी सुनिश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक -अपंग- २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क. -२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ३०/०५/२०१८.

वाचा:- १) अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र:-न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/सुधार-३, दि.१७ मार्च २०११
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्र: -अपंग- २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क.-२, दि.०७.१०.२०१६

प्रस्तावना :-

अपंग व्यक्ती अधिनियम,१९९५ मधील कलम ३३ नुसार केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील ३% पदे अपंग व्यक्तींसाठी **आरक्षित** ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर अधिनियमातील कलम ३२ अन्वये, शासन सेवेतील पदे अपंगांसाठी **सुनिश्चित** करण्यात यावीत, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सदरहू तरतूदीनुसार राज्य शासनाच्या आस्थापनांवरील पदे अपंगासाठी सुनिश्चित करण्यासाठी तज्ञ समिती गठित करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने अपंगांसाठी सुनिश्चित केलेल्या (केंद्र शासनाच्या) पदांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध केलेली आहे. अपंगांशी संबंधीत याचिकेप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, केंद्र शासनाने अपंगांसाठी सुनिश्चित केलेली पदे राज्य शासनाच्या आस्थापनांवरील पदांना लागू करणेबाबत या विभागाच्या दि.१७.०३.२०११ व दि.०७.१०.२०१६ च्या शासन निर्णय अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार केंद्र शासनाने अपंगांसाठी सुनिश्चित केलेली गट अ ते गट ड मधील जी पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर समान आहेत अशा पदांचा सुनिश्चितीबाबतचा शासन निर्णय संबंधित प्रशासकीय विभागाने निर्गमित करण्यात यावे तसेच राज्य शासनाच्या आस्थापनेवर केंद्रशासनाच्या यादीव्यतिरिक्त जी पदे अस्तित्वात आहेत अशी पदे अपंगांसाठी सुनिश्चित करण्याबाबतचे प्रस्ताव वरील तज्ञ समितीसमोर सादर करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने सदर प्रस्ताव या विभागाकडे पाठवावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार विविध प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील पदे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने अपंगासाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील शासकीय/निमशासकीय सेवेतील विविध पदापैकी अपंगाकरिता केंद्र शासनाच्या यादीत सुनिश्चित केलेल्या पदाव्यतिरिक्त जी पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर अस्तित्वात आहेत. अशी पदे सुनिश्चित करण्यासाठी तज्ञ समितीची बैठक दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत महसुल व वन विभाग (वने व भुमि अभिलेख) तसेच गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क) या विभागातंर्गत आस्थापनेवरील गट अ ते गट ड संवर्गातील पदे सुनिश्चित करण्याबाबत समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सोबतच्या **प्रपत्र अ** मधील पदे या शासन निर्णयान्वये सुनिश्चित करण्यात येत आहेत. तर जी पदे अपंग प्रवर्गातील व्यक्तीच्या नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात आली आहेत त्यांची यादी **प्रपत्र ब** मध्ये जोडण्यात आली आहे.

२. मंत्रालयीन अन्य विभागांकडून पद निश्चितीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तज्ञ समितीच्या बैठकीत त्यावर विचार करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५३१११३५५९७३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.06.05 15:22:52 +05'30'

(ज्ञा.ल.सुळ)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी संचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग, हुतात्मा चौक, मुंबई,
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, वि.जा.भ.ज.व इ.मा.व. संचालनालय, पुणे,
१२. सर्व जिल्हाधिकारी,
१३. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
१६. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
१७. सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. कक्ष अधिकारी (कार्यासन फ-४ व ई-६), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई.
१९. कक्ष अधिकारी (कार्यासन रा.उ.शु.- १), गृह विभाग,मंत्रालय मुंबई.
२०. निवड नस्ती अपंग कल्याण -२.

(**शा. नि. क्र** -अपंग- २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क. -२, दि. ३०/०५/२०१८ सोबतचे प्रपत्र - अ)
दि.२६.०४.२०१८ रोजी झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीत अपंगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांची यादी.

<u>प्रपत्र - अ</u>

विभाग क्र.१ महसुल व वन विभाग (वन विभाग)		
१.	संचालक (DFO)	OL.OA.HH
२.	मुख्य वनसांख्यीक	OA.OL.BL.LV.HH
३.	वन अभियंता	OL.OA.HH
४.	सहयोगी प्राध्यापक (अभियंता)	OL.OA.HH
५.	सहयोगी प्राध्यापक (संगणक)	OL.OA.HH.LV
६.	वन वनसांख्यीक	OA.OL.BL.LV.HH
७.	उप वन अभियंता	OL.OA.HH
८.	उप अभियंता (यांत्रिकी)	OL.OA.HH
९.	प्रशिक्षण कार्यक्रम समन्वय (RFO)	OL.OA.HH
१०.	पर्यवेक्षक (RFO)	OL.OA.HH
११.	कार्यशाळा अधिक्षक	OL.OA.HH.LV,
१२.	सहाय्यक वनसांख्यीक	OA.OL.BL.LV.HH
१३.	हस्तशिल्प निर्देशक	OL.HH
१४.	सहा. अभियंता	OL.OA.HH
१५.	शाखा अभियंता	OL.OA.HH
१६.	वनक्षेत्र सर्व्हेक्षक	OL.OA.HH
१७.	वायरलेस ऑपरेटर (वनपाल)	OL.OA
१८.	मुख्य लेखापाल	OA.OL.BL.OAL.HH
१९.	वाणिज्य लेखापाल	OA.OL.BL.OAL.HH.B.LV
२०.	उपलेखापाल	OA.OL.BL.OAL.HH
२१.	उपमुख्य लेखापाल	OA.OL.BL.OAL.HH
२२.	वरीष्ठ सांख्यीकी सहाय्यक	OA.OL.BL.OAL.HH. B.LV
२३.	कनिष्ठ सांख्यीकी सहाय्यक	OA.OL.BL.OAL.HH. B.LV
२४.	सहाय्यक ग्रंथपाल	OA.OL.BL.OAL.HH.
२५.	कनिष्ठ अभियंता	OA.OL.HH
२६.	मशिन निदेशक	OA.OL.HH. LV
२७.	सहाय्यक मशिन निदेशक	OA.OL.HH. LV

२८.	प्रक्षेपक यंत्रचालक	OA.OL.HH. LV
२९.	दृकश्राव्य व्यवस्थापक	OA.OL.HH. LV
३०.	ड्रिलर	OL.HH
३१.	यांत्रिकी	OL.HH. LV
३२.	फिटर/जोडारी	OL.HH
३३.	वेल्डर	OL.HH
३४.	सहाय्यक आरेखक (assistant draftsman)	OL.HH
३५.	सहाय्यक यांत्रिकी	OL.HH. LV
३६.	सहाय्यक संधाता	OL.HH
३७.	बॉक्स बॉय	OL.HH
३८.	शॉ शार्पनर	OL.HH
३९.	विजतंत्री	OL.HH
४०.	शार्पनर	OL.HH
४१.	लोहार	OL.HH
४२.	संग्रहालय सहाय्यक	OL.HH
४३.	सब इंन्स्ट्रक्टर	OL. LV
४४.	प्रसविका	OL
४५.	मिश्रक (कम्पाउंडर)	OL
४६.	वायरलेस ऑपरेटर	OL
४७.	वायरलेस टेक्नीशन	OL
४८.	वायरमन	HH
४९.	बिनतारी संदेशक	OL
५०.	रेडियो मॅकेनीक	OL.HH. LV
५१.	सहाय्यक क्युरेटर	OL. HH
५२.	संदेशवाहक	OA.OL.HH. LV
५३.	चेन मेन	OA
५४.	क्लासरुम अटेंडस	OA.HH. LV
५५.	केबीन अटेंडस	OA.HH. LV
५६.	गॅंगमेन	OA.OL
५७.	हेल्पर	HH. LV
५८.	किमॅन	OL.B.LV.HH.
५९.	बोधारक्षक	HH. LV
६०.	वायरलेस मदतनीस	OL.BL.HH.
६१.	नाईक	OL.B.LV.HH.

६२.	खानसामा	OL.LV.HH.
६३.	खानसामा कम चौकीदार	OL
६४.	पहारेकरी चौकीदार	OL
६५.	मिनी ट्रेन स्वच्छक	OL. HH.
६६.	मॉस्कलश्कर	OL
६७.	नाकेदार	OL
६८.	पंप लेबर	HH
६९.	पॅन क्लिनर	OL. LV.HH.
७०.	रेनिओ ऑपरेटर	OA.OL. LV.OAL.HH.
७१.	देखभाल सेवक	OA.OL. LV. HH.

विभाग क्र.२ महसुल व वन विभाग (भुमि अभिलेख)		
१.	उपसंचालक	HH,LV,OA,OL
२.	जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख	HH,LV,OA,OL
३.	उप अधिक्षक भुमि अभिलेख	HH,LV,OA,OL
४.	उच्चश्रेणी लघुलेखक	OA,OL,BL,OAL,B, LV,HH
५.	निम्नश्रेणी लघुलेखक	OA,OL,BL,OAL,B, LV,HH
६.	शिरस्तेदार/ प्रमुख लिपीक/मुख्यालय सहाय्यक	HH,BL, OA,OL,LV
७.	परिरक्षण भूमापक/ निमतानदार/ दुर्बिन भूमापक	HH,OA,OL,LV
८.	भूकरमापक - लिपीक कनिष्ठ लिपीक छाननी लिपीक, न.भू.लिपीक, दुरुस्ती लिपीक, प्रतिलिपी लिपीक इ.	HH,OA,OL,LV
९.	नाईक/दफ्तरबंद	HH,LV,OA,OL
१०.	शिपाई	HH,LV,OA,OL

विभाग क्र.३ गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)		
१.	कार्यालय अधिक्षक	LV,HH,OA,OL
२.	टिप्पणी सहाय्यक/ वरिष्ठ लिपिक/ लेखापाल	LV,HH,OA,OL
३.	लघुलेखक (उ.श्रे)	B,LV,HH,OA,OL
४.	लघुलेखक (नि.श्रे)	B,LV,HH,OA,OL,BL
५.	लघुटंकलेखक	B,LV,HH,OA,BL
६.	मुख्य टंकलेखक	B,LV,HH,OA,BL
७.	टंकलेखक	B,LV,HH,OA,BL
८.	लिपिक टंकलेखक	LV,HH,OA,BL
९.	दप्तरबंद	LV,HH,OA,OL
१०.	पट्टानाईक	LV,HH,OA,OL
११.	आवेष्टक	LV,HH,OA,OL
१२.	चपराशी	LV,HH,OA,OL

(**शा.नि. क्र** -अपंग- २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क. -२, दि. ३०/०५/२०१८ सोबतचे प्रपत्र - ब)

दिनांक २४.०४.२०१८ रोजी झालेलया तज्ञ समितीच्या बैठकीत खाली नमूद केलेली पदे अपंग प्रवर्गातील व्यक्तीच्या प्रवर्गातील व्यक्तींच्या नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात आलेली आहेत.

प्रपत्र - ब

विभागाचे नाव - महसुल व वन विभाग (वन विभाग)	
१.	विभागीय वन अधिकारी/समकक्ष पदे
२.	सहाय्यक वनसंरक्षक
३.	वनपरिक्षेत्र अधिकारी
४.	वनपाल
५.	वनरक्षक
६.	वननिरीक्षक (वनरक्षक)
७.	वाहनचालक
८.	महावत
९.	मिनी ट्रेनचालक
१०.	वायरलेस वाहनचालक
११.	डिंघी चालक
१२.	मिनी ट्रेन गार्ड
१३.	लॉंच चालक
१४.	लेथमन
१५.	हवादाब यंत्रचालक
१६.	स्वंयबचत विजतंत्री
१७.	शारिरीक शिक्षक निदेशक
१८.	पिटी मास्टर
१९.	गृहप्रमुख
२०.	क्रिडांगण सहाय्यक
२१.	लॉंच तांडेल
२२.	तांडेल
२३.	चाराकटर
२४.	लॉंग लिफ्टर

विभागाचे नाव - महसुल व वन विभाग (भुमि अभिलेख)	
१.	वाहन चालक

विभागाचे नाव -गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)	
१.	अप्पर आयुक्त
२.	सह आयुक्त
३.	संचालक (अंमलबजावणी दस्ता)
४.	उपआयुक्त,(व.श्रे)

५.	विभागीय उपाआयुक्त (व.श्रे)
६.	अधिक्षक
७.	उपअधिक्षक
८.	निरीक्षक
९.	दुय्यम निरीक्षक
१०.	सहाय्यक दुय्यम निरिक्षक
११.	जवान
१२.	जवान-नि-वाहनचालक